**सोलापूर :** सोलापुरात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने प्रतीकात्मक मुखवटा परिधान करून सावित्रीच्या लेकी आल्या. महाराष्ट्र राज्य अंगणवाडी सेविका संघाकडून अंगणवाडी महिला कर्मचाऱ्यांचा घेण्यात आला आनंद मेळावा, अंगणवाडी महिला सेविकांनी सावित्रीबाई फुले यांचे मुखवटे परिधान करून आनंद मेळाव्यात सहभागी झाल्या होत्या. सोलापूर काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांनी उपस्थित राहून सहभाग नोंदवला, अंगणवाडी सेविकांच्या समस्या जाणून घेतल्या.

### खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत

# माळशिरस तालुका चेस असोसिएशनची वार्षिक बैठक उत्साहात संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस** : माळशिरस तालुका चेस असोसिएशनची वार्षिक बैठक चेस असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष तथा खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत अकलूज येथे मोठ्या उत्साहात पार पडली. या बैठकीत क्रीडा क्षेत्रातील योगदानासाठी अनेक मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी माळशिरस तालुका असोसिएशनतर्फे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील क्रीडा आणि बुद्धिबळ क्षेत्राला प्रोत्साहन मिळाल्याचे विशेषतः अधोरेखित करण्यात आले.

आंतरराष्ट्रीय स्तरावर मानांकन मिळवणाऱ्या चि.श्रीराम राऊत याचा सन्मान: श्रीराम राऊत याने बुद्धिबळ स्पर्धेत चमकदार कामगिरी आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त केले. या यशाबद्दल त्याचा सन्मान करण्यात आला. याचबरोबर महाराष्ट्र चेस असोसिएशनतर्फे घेतलेल्या प्रशिक्षक परीक्षेत यश मिळवलेल्या अभिजित बावळे,अनिता बावळे आणि कार्नाक्षी जाधव यांना गौरविण्यात आले. या नव्या प्रशिक्षकांनी बुद्धिबळ प्रचार आणि प्रोत्साहनासाठी काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी तालुक्यात बुद्धिबळ खेळाला अधिक व्यापक स्वरूप देण्याचा आणि नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. कार्यक्रमाने सर्व उपस्थितांना प्रेरणा देऊन सकारात्मक ऊर्जा प्रदान केली.

यावेळेस संजय राऊत, सरतापे सर,संग्राम भांगे राम गाडे,प्रभावती लंगोटे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.



**माळशिरस :** माळशिरस तालुका चेस असोसिएशनची वार्षिक बैठक चेस असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष तथा खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत अकलूज येथे मोठ्या उत्साहात पार पडली. या बैठकीत क्रीडा क्षेत्रातील योगदानासाठी अनेक मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यावेळी माळशिरस तालुका असोसिएशनतर्फे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

● "चेस केवळ एक खेळ नाही, तर तो जीवनातील रणनीती शिकवणारा महत्त्वपूर्ण खेळ आहे. मला आनंद आहे की, माळशिरस तालुका चेस असोसिएशनने बुद्धिबळ खेळाचे महत्व वाढवण्यासाठी प्रसार करण्यासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. यापुढे देखील माळशिरस तालुक्यातील चेस संघटना मेहनतीने तालुक्यात चेस खेळाचा अधिक प्रसार करतील व खेळाडू घडवतील असे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

## मी सोलापूर माझे सोलापूर समिती परिवर्तन घडवेल



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मंगळवेढा** : ब्र मी सोलापूर माझे सोलापूर परिवर्तन व विकास समितीच्या वतीने समितीच्या नूतन पदाधिकारी पदग्रहण समारंभ जिल्हा सरकारी वकील प्रदीप सिंह रजपूत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी रजपूत म्हणाले मी सोलापूर माझे सोलापूर परिवर्तन व विकास समिती सोलापुरात नक्कीच परिवर्तन घडवेल. यावेळी ब्रह्मदेव माने बँकेचे संचालक व रोटरी क्लब जुळे सोलापूर माजी अध्यक्ष सचिन चौधरी, ऍड. मंगेश श्रीखंडे, पत्रकार सुरक्षा समितीचे प्रदेश अध्यक्ष यशवंत पवार, योगा श्रीराम मिशन संस्थेचे दिपक कोंडा, ॲड. मुनिनाथ, विष्णू कारमपुरी उपस्थित होते.

# जात पडताळणी समितीकडे 40 हजार अर्ज प्रलंबित

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर** : राज्यातील 36 जिल्ह्यामध्ये शासनाने जात पडताळणी समिती स्थापन केली आहे. मात्र 36 पैकी 33 जिल्ह्यात जात पडताळणी समितीचे अध्यक्ष पद रिक्त असल्यामुळे गेल्या दोन वर्षापासून राज्यात चाळीस हजार अर्ज जात पडताळणीच्या प्रतीक्षेत असल्याचे दिसून येत आहे. तरी शासनाने अध्यक्षाची निवड लवकर करून अर्ज निकाली काढावेत अशी मागणी होत आहे. शिक्षण,नोकरी व शासकीय विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी जातीचा दाखला जोडणे बंधनकारक करण्यात आले आहे. जातीचा दाखला देण्यासाठी शासनाने 36 जिल्ह्यात जात पडताळणी समिती स्थापन केली आहे. जेणेकरून लाभार्थ्याला लवकर दाखला मिळण्यास सुलभ होईल. मात्र गेल्या दोन वर्षापासून 36 पैकी 33 जिल्ह्यात जात पडताळणी समितीचे अध्यक्ष नसल्याने जात पडताळणीचे काम रखडले आहे. यामुळे 40 हजार अर्ज जात पडताळणीच्या प्रतीक्षेत असल्याचे दिसून येत आहे. राज्यात महायुतीची सत्ता आली आहे.

यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी 33 जिल्ह्यात जात पडताळणीच्या अध्यक्षांची निवड करून लाभार्थ्यांना लवकरात लवकर दाखले देण्यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी होत आहे. गेल्या अडीच वर्षात महायुती शासनाने अनेक योजना जाहीर केल्या आहेत. याचा लाभ नागरिकांना मिळाला आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गतिमान शासन असल्याचे दाखवून नागरिकांची कामे वेळेत करून दाखविली आहेत. यामुळे महायुतीवर नागरिकांचा विश्वास बसल्यामुळे पुन्हा 2024 च्या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी महायुतीला साथ दिली असल्याचे दिसून येत आहे. यामुळे जात पडताळणी समितीचे अध्यक्ष लवकर निवड करून लाभार्थ्यांना दाखले देण्यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी होत आहे.

## भेट...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**बार्शी :** आमदार दिलीप सोपल यांनी बार्शी तालुक्यातील प्रलंबित विकासकामे आणि स्थानिक नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी जिल्ह्यातील प्रमुख अधिकाऱ्यांची भेट घेतली. जिल्हाधिकारी डॉ. कुमार आशीर्वाद आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुलदीप जंगम यांच्याशी झालेल्या चर्चेत रस्ते विकास, पाणीपुरवठा योजना, शैक्षणिक सुविधा, आणि अन्य प्रलंबित प्रश्नांवर उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. या बैठकीत विकासकामांना गती देण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन संबंधित अधिकाऱ्यांनी दिले.

## Selected

## पहिल्या आठवड्यात जिल्ह्यात थंडीचा जोर राहणार



**सोलापूर :** ढगाळ वातावरण व देशाच्या काही भागात आलेल्या वादळामुळे जिल्ह्यात थंडी फारशी जाणवली नाही. आता मात्र नव्या वर्षाच्या पहिल्या आठवड्यापासून थंडीचा जोर जाणवणार आहे. जिल्ह्याच्या किमान तापमानात घट होत आहे. मागील काही दिवसांपासून असलेले अवकाळी पावसाचे सावट दूर झाले आहे. त्यामुळे नवीन वर्षात पुन्हा थंडीची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तविण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यातून थंडी गायब झाली होती. ढगाळ वातावरण आणि पावसामुळे राज्याच्या किमान तापमानात वाढ झाली होती.

## उजनीच्या पाण्यासाठी कालव्यात ठिय्या आंदोलन



**सोलापूर :** जिल्ह्यातील रब्बी पिकांसाठी उजनी धरणातून कालव्याला पाणी सोडण्यात यावे. या मागणीसाठी आज शिवसेनेच्या युवा सेना यांच्या वतीने कालव्यात उभारून घोषणाबाजी करत ठिय्या आंदोलन करण्यात आले. पालकमंत्री नसल्याने कलवा सल्लागार समितीची बैठक नाही. अशा परिस्थितीत थेट मुख्यमंत्र्यांनी आदेश देऊन अथवा जलसंपदा मंत्र्यांनी बैठक घेऊन कालव्याला पाणी सोडावे. अशी मागणी युवा सेनेच्या वतीने करण्यात आली आहे. युवा सेनेने कालव्यात उतरून आंदोलन केल्याने पाणी मागणीचा जोर आता येत्या काळात अधिक वाढताना दिसेल.

## राधाकृष्ण विखे पाटील यांचा सत्कार



**सोलापूर :** राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे सोलापूर दौऱ्यावर आले असता सोलापूर दक्षिण विधानसभा मतदार आमदार सुभाष देशमुख यांच्या निवासस्थानी त्यांनी भेट दिली. यावेळी आमदार देशमुख यांनी त्यांचा शाल पांघरून व ग्रामदैवत श्री सिद्धेश्वरांची मूर्ती देऊन सत्कार केला व त्यांचे स्वागत केले.

## सोलापूर विद्यापीठाच्या'2025 दैनंदिनी'डायरीचे प्रकाशन



**सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या '2025 दैनंदिनी' डायरीचे प्रकाशन कुलगुरु प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते करण्यात आले. कुलगुरू कार्यालयात पार पडलेल्या दैनंदिनी डायरी प्रकाशनाच्यावेळी प्र-कुलगुरु प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, दैंनदिनी समितीचे अध्यक्ष डॉ. गौतम कांबळे, डॉ. अर्चना लावंड, डॉ. राजीवकुमार मेंते, प्रा. चंद्रकांत गार्डी, अधिसभा सदस्य प्रा. वीरभद्र दंडे तसेच दैनंदिन समितीचे सदस्य सचिव, सहायक कुलसचिव सोमनाथ सोनकांबळे आदी उपस्थित होते.

# बस वेळेत सुटत नसल्याने जीवघेणा प्रवास



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**करमाळा** : करमाळा एसटी बस आगारातून कुर्डुवाडी-करमाळा एसटी बस वेळेत सोडण्यात यावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी आगार प्रमुखांकडे केली आहे. याबाबत आज (गुरुवारी) संतप्त विद्यार्थ्यांनी लेखी निवेदन दिले आहे. वरकुटे, अळसुंदे, सालसे आदी ठिकाणावरून येणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. करमाळा आगारातून सकाळी व सायंकाळी सुटणारी बस वेळेवर सुटत नाही. त्यामुळे सकाळी शाळा व महाविद्यालयात येणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. महाविद्यालय सुटल्यानंतर विद्यार्थिनींना घरी जाण्यासाठी उशीर होत आहे.

## मैंदर्गीतील चिमुकलीचा मृत्यू




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : अक्कलकोट ते गाणगापूर रस्त्यावरील मैदर्गीजवळ झालेल्या कार व टेम्पोमध्ये झालेल्या भीषण अपघातामध्ये ३ वर्षीय चिमुकलीला वाचवण्यासाठी डॉक्टरांनी शक्तीचे प्रयत्न केले. परंतु, अपघातातील चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ऋतुजा मोहन शिरलेवाड (वय ३ वर्षे, रा. चिंबली, ता. खेड, जि. पुणे) असे मृत मुलीचे नाव आहे. अपघात घडताच जखमींना अक्कलकोट येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. चार तास मृत्यूशी झुंज देणाऱ्या ऋतुजाची अखेर प्राणज्योत मावळली आहे.

# सैफी बुरहानी एक्सपोकडून 'गो ग्रीन'चा संदेश देत रॅली




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : हरित करून प्रदूषण मुक्त करण्याच्या मोहिमेचा प्रचार प्रसार करण्याच्या उद्देशाने दाउदी बोहरा समाजाच्या वतीने सैफी बुरहानी एक्सपो 2025 तर्फे 'गो ग्रीन' रॅली काढण्यात आली. या रॅलीत अब्दली भाईसाब- अमिल साब, इदरीस भाईसाब, मोइज़ जमाली, हुज़ेफा परदावाला, कुरेश घोडनादिवाला, फखरुद्दीन चोपड़ावाला, हमजा छत्रिस, अब्दुल कादिर सद्भावनासह लहान मुलांपासून तर वृद्धांचा समावेश होता.

## परस्परविरोधी १३ जणांवर गुन्हा दाखल




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला** : लघुशंका करण्याच्या किरकोळ वादातून दोन गटात जबर मारहाण झाली. सांगोला शहरातील मुजावर गल्ली येथे घडली होती. याबाबत, फिरदोस अल्लारखा खतीब (रा. मुजावर गल्ली, सांगोला) व पंडित बळीराम सुरवसे (रा. कडलास नाका, सांगोला) सांगोला पोलिसात परस्परविरोधी फिर्याद दिली आहे. या प्रकरणी पोलिसांनी पंडित सुरवसे, अमित सुरवसे, सुधीर वर्मा यासह दोन अनोळखी इसम तसेच मोहसीन खतीब, अल्लारखा खतीब, मोहम्मद मुलाणी यासह इतर चार ते पाच अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा दाखल केला.




गीर गाईचे शुद्ध दूध मिळेल. त्वरित संपर्क साधा

आयुर्वेद शास्त्राच्या मताप्रमाणे गीर गाईचे दूध हे ह्युमिनिटीप्रधान तसेच लहान बालकांसाठी अत्यंत उपयुक्त असे आहे.

### अनंतलाल (दादा) दोशी यांच्या शुभहस्ते रत्नत्रय दिनदर्शिका 2025 चे प्रकाशन

# रत्नत्रयपत संस्थेचे कार्य कौतुकास्पद- शितलकुमार दोशी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस** : सदाशिवनगर येथील रत्नत्रय पतसंस्था करीत असलेले कार्य कौतुकास्पद आहे पतसंस्था सामाजिक बांधिलकी जपत विविध कामे सदाशिवनगर व पंचक्रोशीत करीत असल्या मुळे हि पतसंस्था आदर्श पतसंस्था ठरली आहे असे प्रतिपादन फलटण येथील कीर्ती बुक डेपो चे मालक मा. श्री. शितलकुमार दोशी यांनी केले ते प्रमुख पाहुणे म्हणून प्रकाशनासाठी उपस्थित होते रत्नत्रय परिवाराचे संस्थापक मा. श्री.अनंतलाल (दादा) दोशी यांच्या शुभहस्ते रत्नत्रय दिनदर्शिका 2025 चे प्रकाशन करण्यात आले यावेळी रत्नत्रय पतसंस्थेचे चेअरमन व सदाशिवनगर ग्रामपंचायत चे सरपंच मा. श्री विरकुमार (भैया) दोशी, प्रणव दोशी, अजय गांधी सुरेश धाईजे विलास साळुंखे सचिव ज्ञानेश राऊत यांच्या प्रमुख उपस्थित दिनदर्शिका प्रकाशनाचा कार्यक्रम पतसंस्थेच्या कार्यालयात पार पडला.....

पतसंस्था ऑनलाईन व्यवहार करीत आहे संस्थेमार्फत सभासदांना डीडी काढणे आरटीजीएस एनएफटी च्या माध्यमातून पैसे पाठवणे व रोख पैसे काढणे ,आर डी व पिग्मी गोळा करणे, पिग्मी ची रक्कमा दर मह कर्ज खाते जमा करणे अशा विध सुविधा संस्थेमार्फत सभासदांना पुरवल्या असल्यामुळे व्यवहार सुरळीत चालू आहेत. पतसंस्थेची स्थापना 2004 रोजी परिसरातील छोट्या व्यवसायिकांना सुलभ रीतीने कर्ज मिळावे व त्याची उन्नती व्हावी या उद्देशाने करण्यात आली असून या पतसंस्थेच्या प्रगतीस सर्व सभासद ठेवीदार संचालक व कर्मचारी वर्ग यांचा मोठा सहभाग असून हि पतसंस्था सगळ्यांना चांगली सेवा देते आहे. आर्थिक व्यवहाराबरोबरच ही संस्था अनेक सामाजिक कार्य हि करून समाजसेवा करीत आहे. गेली 20 वर्ष रत्नत्रय पतसंस्था ही दरवर्षी दिनदर्शिका काढत असते तसेच सर्व जाहिरात दाराच्या सहकार्यातून दिनदर्शिका निघत असते असेच प्रेम संस्थेवर राहावे त्याबद्दल सर्व जाहिरातदारांचे आभार श्री. अनंतलाल (दादा) दोशी यांनी मानले व सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या .



दि.31/03/2024 अखेर संस्थेकडे 22 कोटी ठेवी असून संस्थेने 18 कोटी ₹ कर्ज वाटप केलेले आहे संस्थेचे भाग भांडवल 44 लाख रुपये असून गुंतवणूक 8 कोटी रुपये इतकी आहे संस्थेचे वार्षिक उलाढाल 137 कोटी असून सर्व खर्च वजा जाता संस्थेला 29 लाख रुपये इतका नफा राहिलेला आहे संस्थेचे व्याजदर पुढीलप्रमाणे आहेत 46 दिवस ते 6 महिने 5%, 7 महिने ते 12 महिने 6%, 13 महिने ते 23 महिने 7%, 24 महिने ते 35 महिने 8%, 36 महिने पुढे 9%,

दाम दुप्पट ठेव 8 वर्षे 6 महिने तारणे कर्जास व्याजदर 13% आहे अशी माहिती संस्थेचे चेअरमन श्री. विरकुमार दोशी यांनी दिली तसेच आभार प्रदर्शन संस्थेचे सचिव श्री ज्ञानेश राऊत यांनी मानले सदर कार्यक्रम पार पडण्यासाठी संस्थेचे हेमंत कुलकर्णी वैभव मोडासे मंगेश जगताप टी.डी. देशमुख निता रणवरे विक्रम पालवे यांनी काम पाहिले.

